# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १७७-२३** **दिनांक ०३/०६/२०२३**

## हातावर गोंदलेल्या टॅटूवरुन २४ तासाच्या आत खुनाच्या गुन्हयाची उकल. परिमंडळ १ मधील पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकांची कामगिरी.

उत्तन सागरी पोलीस ठाणे हद्दीमधील पातान बंदर समुद्रकिनारी येथे दिनांक ०२/०६/२०२३ रोजी सकाळी ८:०० वा. चे पूर्वी एक अनोळखी महिला वय अंदाजे २५ ते ३० वर्षे, अंगात मरून रंगाचा हाफ बाहयांचा टी शर्ट व काळसर रंगाची हाफ पँट हीस कोणीतरी अज्ञात इसमांनी अज्ञात कारणावरून जीवे ठार मारून तिचे मुंडके शरीरापासून वेगळे करून शरीराचे धडाचे दोन तुकडे करून बॅगेमध्ये भरून तिची ओळख पटु नये या उद्देशाने सदर बॅग समुद्रामध्ये कुठेतरी फेकुन दिलेबाबत पालीगावचे पोलीस पाटील श्री. मेलवीन पावलु अंद्रादे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उत्तन सागरी पोलीस ठाणेत गु.रजि.क्र. I ६५/२०२३ भां.दं.वि.सं कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१ यांनी परिमंडळ १ मधील पोलीस ठाणेत कर्तव्यास असलेल्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना गुन्हयाच्या घटनास्थळी बोलावून गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याअनुषंगाने काशिमिरा व नवघर पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी अनुक्रमे सपोनि प्रशांत गांगुर्डे, पोउनि अभिजित लांडे व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी मयताचे हातावरील टॅटूच्या आधारे तसेच तांत्रिक विश्लेषणातुन प्राप्त माहितीचे आधारे अनोळखी मयत हिची ओळख पटवुन तिचे नाव श्रीमती अंजली मिंटु सिंग, वय २३ वर्षे, रा. राज अपार्टमेंट, डांबर प्लँट जवळ, राजवली गांव रोड, नायगांव (पुर्व) असे असल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर नमुद गुन्ह्यात आरोपीत नामे १) मिंटु रामब्रिज सिंग, वय ३१ वर्षे, व्यवसाय सिक्युरीटी गार्ड, रा. राज अपार्टमेंट, डांबर प्लँट जवळ, राजवली गांव रोड, नायगांव (पुर्व), २) चुन चुन रामब्रिज सिंग, वय ३५ वर्षे, व्यवसाय सिक्युरिटी सुपरवायजर रा. महाविर नगर, पुष्पा हॅरिटेज, डहाणुकरवाडी रोड, HDFC बँकेसमोर, कांदिवली (प), मुंबई यांना ताब्यात घेवून तपास केला असता त्यांनी वर नमूद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने दोन्ही आरोपीतांना पुढील तपासकामी उत्तन सागरी पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे. नमूद महिलेस चारित्र्याचे संशयावरून ठार मारले असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून सदर गुन्हयाचा पुढील तपास उत्तन सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाराम करांडे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. जयंत बजबळे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ ०१ मिरारोड, श्रीमती दिपाली खन्ना, सहा.पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली परिमंडळ ०१ मधील पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे, मनोरे, पो.उप.नि. अभिजित लांडे, यादव, उबाळे, कुरेवाड, स.फौ. अनिल पवार, पो.हवा. भुषण पाटील, सुरेश चव्हाण, निलेश शिंदे, मंगेश शिंदे, संजय कोंडे, राजेश आसवले, प्रदीप गवळी, रवींद्र बागुल, पोलीस अंमलदार रवी कांबळे, हनुमंत माने, घुणावत, जाधव यांनी संयुक्तरित्या केलेली आहे.





----oooo----